MHNG030120402015

| | |
|---|---|
| दाखल तारीख | ०७–०४–२०१५ |
| नोंदणी तारीख | ०७–०४–२०१५ |
| निकाल तारीख | २५–०८–२०२२ |
| कालावधी | ०७ ०४ १८ |
| | वर्ष महिने दिवस |

## न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय क्र.३ नागपूर यांच्या न्यायालयात

## (पिठासीन अधिकारी व.म.देशमुख)

**सं.फौ.ख.क्र. १०७२०/२०१५** **नि.क्र.२६**

**महाराष्ट्र. शासन तर्फे**
**पोलिस स्टेशन अधिकारी,**
**लकडगंज पोलीस ठाणे,नागपूर** **अभियोगपक्ष**

**विरुध्द**

**१. हरीश दिनदयाल जनवारे ,**
वय २९ वर्ष , व्यवसाय– खाजगी,
राह. शांती नगर, क्वार्टर नं. आय–१५९, नागपूर. **आरोपी**

**२. वसंत महादेवराव उईके ,**
वय ४६ वर्ष , व्यवसाय– खाजगी,
राह. शांती नगर,दत्त मंदिर जवळ, नागपूर.

**गुन्हा कलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये.**

**उपस्थिती**

सरकार पक्षातर्फे विधीज्ञ : श्री.एस.एम.दुंगे
आरोपीतर्फे विधीज्ञ : श्री.एन.आर.गांधी

**–:: न्यायनिर्णय ::–**

**(पारित दिनांक :२५–०८–२०२२)**

**०१.** प्रस्तुतचा खटला हा आरोपीविरुध्द १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

**अभियोग पक्षातर्फे थोडक्यात हकीकत अशी आहे की –**

**०२.** फिर्यादी नामे श्री. हेमेन्द्र प्रभाकर तिवारी, पो.हवा. ब.नं. ३४८९, पो.स्टे. लकडगंज, नागपूर यांनी तक्रार नोंदविली की, दि. १९–०२–२०१३ रोजी ते पोलीस स्टेशन लकडगंज येथे कार्यरत होते. तेव्हा १६.२० वा.सुमारास, हनुमान सेनेचे कार्यकर्ते व वरील आरोपी पिवळे झेंडे घेउन पोलीस स्टेशनच्या आवारात बिना परवाना जमा होउन दि. १८–०२–२०१३ रोजी आमदार श्री कृष्णा खोपडे यांनी त्यांचया दोन कार्यकर्ते यांना पोलीस स्टेशनला आणल्यावरुन पोलीस स्टेशनला येउन त्या दोन्ही कार्यकर्ते यांना घेउन गेले, म्हणून नाराजी व्यक्त करुन हनुमान सेना जिंदाबाद, कृष्णा खोपडे मुर्दाबाद, तानाशाही नही चलेगी, आमदारांना अटक करा, आमदारांचे विरुध्द गुन्हा नोंद झालाच पाहिजे, आमदारकी मनमानी नही चलेगी, असे नारेनिदर्शने करुन विनापरवाना पोलीस स्टेशनच्या आवारात जमा होउन महाराष्ट्र पोलीस कायदा अंतर्गतचे कलम ३७ (१)(३) नुसार आदेशाचे भंग केल्याने शिक्षाधीन कलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा प्रमाणे तक्रार दाखल केली.

**०३.** फिर्यादवरुन आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन लकडगंज येथे अपराध क्र. ३१६९/२०१३ अन्वये शिक्षाधीन कलम १३५ मपोका प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. आरोपीला अटक करण्यात आली. साक्षीदारांचे बयान घेतले. तपासाअंती दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**०४.** आरोपीविरुध्द नि.क्र. ११ वर कलम १३५ मपोका प्रमाणे दोषारोप निश्चित केले. त्यातील मजकूर आरोपीला वाचून व समजावून सांगितला. आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणे निवेदन नि.क्र. २४ व २५ वर नोंदविण्यात आले. आरोपीने त्याला खोटया प्रकरणात गुंतविल्याचा बचाव घेतला आहे.

**०५.** दोन्ही पक्षाचा युक्तीवाद, उपलब्ध कागदोपत्री पुराव्यावरुन न्यायनिर्णय देतांना खालील मुद्दे उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष खालील कारणासहीत नोंदवित आहे.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दि. १९-०२-२०१३ रोजी १६.२० वा.सुमारास पोलीस स्टेशन लकडगंज, नागपूर येथे आरोपी यांनी पोलीस स्टेशनच्या आवारात बिना परवाना जमा होउन नारेनिदर्शने करुन महाराष्ट्र पोलीस कायदा अंतर्गतचे कलम ३७ (१) (३) नुसार आदेशाचे भंग केले आणि त्याद्वारे महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा केला ? . | **नाही** |
| २ | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ साठी –**

**०६.** फौजदारी कायद्याचे प्रस्थापित तत्व आहे की, आरोपीवरील गुन्हा सर्व संशयापलीकडे जाउन सिध्द करण्याचा संपूर्ण भार हा अभियोगपक्षावर असतो. सदर प्रकरणात आरोपी यांनी पोलीस स्टेशनच्या आवारात बिना परवाना जमा होउन नारेनिदर्शने नारेनिदर्शने करुन महाराष्ट्र पोलीस कायदा अंतर्गतचे कलम ३७ (१)(३) नुसार आदेशाचे भंग केले ही बाबी शाबीत होणे गरजेचे आहे.

**०७.** अभियोग पक्षाने आरोपींवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द करण्याकरीता केवळ एकच साक्षीदार तपासण्यास आले. सा.क्र. १ नामे श्री हेमेन्द्र प्रभाकर तिवारी यांची साक्ष नि.क्र. १६ वर तपासली आहे. एका साक्षीदारास अभियोगपक्षाने पुनरावृत्तीच्या कारणास्तव तपासण्यास नाकारले आहे. सदर प्रकरणातील इतर तीन साक्षीदारांना समंस काढुनही अभियोगपक्ष त्यांची साक्ष या न्यायालयात नोंदवू शकले नाही. त्यांचे समंस नि.क्र. २१ ते २३ वर आहेत. करीता अभियोगपक्षाच्या पुराव्याची बाजू नि.क्र. १ वर आदेश पारित करुन बंद करण्यात आली आहे.

**०८.** सा.क्र. १ हयाने आपल्या सरतपासामध्ये सांगितले आहे की, दि. १९-०२-२०१३ रोजी ते पो.स्टे. लकडगंज येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होते. सदर दिवशी त्यांची सकाळी ०९.०० ते रात्री ०९.०० वाजे पर्यंतची कामगिरी होती.

त्यावेळी हनुमान सेना यांचे काही कार्यकर्ते पो.स्टेला आले. ते २५ ते ३० जण होते व ते नारेबाजी करीत होते. सदर आरोपींमध्ये चंद्रकांत कुंभारे, हरीश दिनदयाल जनावरे, महेंद्र उके, संगपाल मेश्राम व अजय हवेलिया व इतर काही लोकं होते. ही घटना पोलीस स्टेशनच्या आवारात घडली होती. सदर आरोपी हे आमदार कृष्णा धोपडे यांच्या विरुध्द नारेबाजी करीत होते. कृष्णा धोपडे मुर्दाबाद हनुमान सेना जिंदाबाद असे नारे देत होते. सदर घटनेच्यावेळी माननीय सह पोलीस आयुक्त यांचे कलम ३७(१–३) महाराष्ट्र पोलीस कायदा नुसार आदेश अंमलात होते. घटना ही माझ्या समक्ष घडल्याने व मी घटनेच्यावेळी पोलीस स्टेशनला हजर असल्याने मी सदर घटनेबाबत फिर्याद दिली. साक्षीदारास नि.क्र. १७ व १८ वरील रिपोर्ट व छापील एफ आय आर दाखविण्यात आली असता ती तीच असल्याचे साक्षीदार सांगत असून त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगत आहे. साक्षिदारास कलम ३७(१–३) महाराष्ट्र पोलीस कायदाच्या अनुषंगाने दिनांक ०६–०२–२०१३ रोजीचे आर्टीकल अ वरील आदेशाची छायांकित प्रत दाखविण्यात आली. साक्षिदार सांगतो की सदर आदेश ते तेच असल्याचे साक्षीदार सांगत आहे.

**०९.** सदर अभिलेखावरील साक्षपुराव्याचे अवलोकेन केले असता असे दिसून येते की, आज रोजी फिर्यादी यांच्या साक्षपुराव्यास ईतर कोणत्याही साक्षपुराव्याची जोड नाही. तसेच तपासी अधिकारीमार्फत साक्षीदार नामे धरमसींग मसराम यांचे बयान सुध्दा जोडण्यात आलेले नाही. तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा अंतर्गत कलम ३७ प्रमाणे देण्यात आलेल्या आदेशाची मूळ प्रत किंवा सत्य प्रत सुध्दा सदर प्रकरणात दाखल नाही. तसेच सदर आदेश प्रकाशीत झाल्याबाबत सुध्दा कोणतेही दस्त अभिलेखावर नाही. सबब, महाराष्ट्र पोलीस कायदाचे कलम १५५ व भारतीय पुरावा कायदा कलम ७६ व ७९ प्रमाणे सदर आदेश व परिपत्रक हे सिध्द होउ शकले नाही. सदर प्रकरणात तपासी अधिकारी यांनी ईतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदार यांचे बयान सुध्दा सदर प्रकरणात जोडलेले नाही. अशावेळी अभिलेखावरील उर्वरीत साक्षीदार यांना तपासून ही अभियोगपक्ष आरोपीचा गुन्हा सिध्द करु शकत नाही. एकंदरीत, आरोपीविरुध्दचे आरोप अभियोगपक्ष सबळ, स्पष्ट व सुसंगत पुराव्यानिशी सिध्द करु शकले नाही. करीता आरोपी दोषमुक्त होण्यास पात्र आहे. आरोपी क्र. ३ ते ८ विरुध्द प्रकरण प्रलंबीत ठेवून त्यांच्या विरुध्द पकडवॉरंट काढण्यात यावे.

**१०.** सबब, सदर प्रकरणात अभियोगपक्ष आरोपी क्र. १ व २ विरुध्दचे दोषारोप

सिध्द करण्यास असमर्थ ठरल्याने मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते व मुद्दा क्र. २ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १ व २ यांस महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ खालील शिक्षापात्र अपराधातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपी क्र. १ व २ यांचा जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपी क्र. १ व २ यांचे कलम ४३७–अ फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे रक्कम रुपये ७,५००/– चे पुढील सहा महिन्याकरीता वैयक्तिक बंधपत्र लिहून द्यावे.

४. आरोपी क्र. ३ ते ८ विरुध्द प्रकरण प्रलंबीत ठेवून त्यांच्या विरुध्द पकडवॉरंट काढण्यात यावे.

**नागपूर**
**दि.२५–०८–२०२२**

**(व्ही.एम.देशमुख)**
**न्यायदंडाधिकारी,प्रथम श्रेणी,**
**न्यायालय क्र. ३, नागपूर**